OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- दिनांक -१६/१२/२०२५

---

प्रति,

मा.संपादक,
दैनिक---------------

विषय :- मा. डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे संकल्पनेतुन पोलीस अधीक्षक कार्यालय जळगांव येथे १०० किलोवॅट क्षमतेचे सोलर प्लॅंट कार्यान्वित करण्यात आले बाबत.

----०००-----

पोलीस अधीक्षक, कार्यालय जळगांव येथे पोलीस अधीक्षक, कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक, कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय जळगांव भाग, स्थानिक गुन्हे शाखा, कार्यालय, जिल्हा विशेष शाखा कार्यालय अशा शाखा असून सर्व शाखा या संगणीकृत करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या शाखांमध्ये जवळपास महिन्याकाठी अंदाजे १०००० ते ११००० युनिट्स वीज खर्च होत असते.

मा. डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे संकल्पनेतुन पोलीस अधीक्षक, कार्यालयाचे छतावर नव्याने ४००० ते ५००० स्क्वेअर फूट जागेमध्ये Sunstroat Green technology Pvt Ltd या कंपनीच्या १८४ सोलर प्लेट असलेला प्लांट बसविण्यात आला असून सदर सोलर प्लांट मुळे दिवसाला कमीत कमी ३०० युनिट्स वीज व उन्हाळयात ४०० ते ४५० युनिट्स वीज तयार होणार आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक कार्यालयातील वीज बिल खर्च कमी होणार असून अधिकची वीज तयार होणार आहे.

सदर सोलर प्लांटचे उद्घाटन मा. श्री रोहन घुगे, जिल्हाधिकारी जळगांव यांचे हस्ते करण्यात आले असुन सदर प्रसंगी मा. डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव, मा. श्री अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, जळगांव, मा. श्री अरुण आव्हाड, पोलीस उपअधीक्षक (गृह), जळगांव, मा.श्री नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जळगांव उपविभाग,श्री राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव हे उपस्थितीत होते.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस



VSOLE




VSOLE






VSOLE